**ठळक बातम्या**

- देशातले तरुण आपल्या कठोर परिश्रमातून राष्ट्राची सक्षमता जगाला दाखवून देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं राष्ट्रीय रोजगार मेळाव्यात प्रतिपादन

- मुंबईत झालेल्या २६/११च्या दहशतवादी हल्ल्यामध्ये कोणताही सहभाग नसल्याचा तहव्वूर राणाचा दावा

- मध्य प्रदेशात बालाघाटमधे आज सुरक्षादलांशी झालेल्या चकमकीत चार माओवादी ठार

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि पंजाब किंग्स यांच्यात रंगणार

**<><><><><>**

देशातले तरुण आपल्या कठोर परिश्रम आणि नवनवीन उपक्रमांमधून राष्ट्र किती सक्षम आहे हे जगाला दाखवून देत आहेत, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. राष्ट्रीय रोजगार मेळाव्यात विविध सरकारी विभागांमध्ये नवनियुक्त ५१ हजारांहून अधिक तरुणांना दूरस्थ पद्धतीनं आज मोदी यांनी नियुक्ती पत्रं वाटली, त्यानंतर ते बोलत होते. अर्थसंकल्पात सरकारनं उत्पादन अभियानाची घोषणा केली असून त्याचं उद्दिष्ट ‘मेक इन इंडियाला प्रोत्साहन देणं, देशातल्या तरुणांना जागतिक दर्जाची उत्पादनं बनवण्याची संधी देणं हे असून यामुळे लाखो सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग तसंच, लघु उद्योजकांना चालना मिळेल त्याचबरोबर देशभरात रोजगाराच्या नवीन संधीही खुल्या होतील, असं त्यांनी यावेळी सांगितलं. देशाच्या प्रगतीत महिलांचं योगदान अतिशय महत्त्वाचं असल्याचा पुनरुच्चारही प्रधानमंत्र्यांनी केला. ते म्हणाले,

**बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी (३४ सेंकद)**

मुंबईत येत्या १ ते ४ मे दरम्यान होणाऱ्या वेव्ह्ज २०२५ परिषदेचाही उल्लेख त्यांनी केला. या परिषदेमुळे डिजिटल कंटेंट क्षेत्राच्या भविष्याला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी (३४ सेंकद)**

१५ वा रोजगार मेळा आज देशभरातल्या ४७ ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. आज निवड आणि भरती झालेले कर्मचारी महसूल विभाग, कार्मिक आणि सार्वजनिक तक्रार निवारण आणि निवृत्ती वेतन मंत्रालय, गृह मंत्रालय, टपाल विभाग, उच्च शिक्षण विभाग, रेल्वे मंत्रालय, कामगार आणि रोजगार मंत्रालय यासारखी विविध मंत्रालयं आणि विभागांमध्ये सामील होणार आहेत.

मुंबईत झालेल्या एका कार्यक्रमात केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या हस्ते नियुक्ती पत्रांचं वाटप झालं. आपण सर्वांनी एकत्र येऊन देशाच्या कल्याणासाठी काम केलं तर देश निःसंशयपणे सुरक्षित हातात असेल आणि कोणतीही शक्ती आपल्याला विकसित भारत होण्यापासून रोखू शकत नाही, असं पियूष गोयल या कार्यक्रमात म्हणाले. आयकर विभागानं मुंबईत यशवंतराव चव्हाण केंद्रात रोजगार मेळाव्याअंतर्गत नियुक्तीपत्र वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला होता. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी यावेळी २५ जणांना प्रातिनिधिक स्वरूपात नियुक्तीपत्रं वितरित केली. मुंबई विभागाचे प्रधान मुख्य आयकर आयुक्त राज टंडन यावेळी उपस्थित होते.

पुण्यात झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांच्या हस्ते नियुक्ती पत्रांचं वाटप करण्यात आलं. प्रधानमंत्री मोदी यांनी या देशातल्या तरुणांच्या हाताला काम देण्याचं काम केलं असून दहा लाखापेक्षाही अधिक सरकारी नोकऱ्या त्यांनी उपलब्ध करून दिलेल्या आहेत आणि याचा नक्कीच फायदा या तरुण वर्गाला होईल, असं मत नड्डा यांनी व्यक्त केलं. प्रधानमंत्री नरेंद्र

मोदींच्या नेतृत्वात आयोजित करण्यात येणारा राष्ट्रीय रोजगार मेळावा हा नोकरी प्रदान करण्यासोबतच राष्ट्रनिर्माण करणारा मेळावा असून देशातील तरुणांना सरकारी विभागात नोकरी प्रदान करून जनतेला सर्व सेवासुविधा वेळेवर देण्यासाठी भारत सरकार वचनबद्ध आहे, असं प्रतिपादन नागपूरमध्ये आयोजित राष्ट्रीय रोजगार मेळाव्यात आयकर विभागाच्या प्रधान मुख्य आयुक्त डॉ. हर्षवर्धिनी बुटी यांनी केलं.

**<><><><>**

सर्वम AI या स्टार्टअपची निवड स्वदेशी बनावटीच्या पहिल्या artificial intelligence सॉफ्टवेअरचं foundational model बनवण्यासाठी झाली आहे. केंद्र सरकारनं आज याची घोषणा केली. एकूण ६७ प्रस्तावांमधून सर्वम AI ची निवड झाल्याचं केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. जगातल्या इतर AI सॉफ्टवेअरच्या तोडीस तोड सॉफ्टवेअर देशात तयार होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

इलेक्ट्रॉनिक्स कंपोनंट उत्पादन प्रोत्साहन योजनेचे दिशानिर्देश त्यांनी आज जाहीर केले. लवकरच आणखी २-३ स्टार्टअप यात सहभागी होतील, असं ते म्हणाले. गेल्या महिन्यात केंद्रीय मंत्रीमंडळानं या सुमारे २३ हजार कोटी रुपयांच्या योजनेला मंजुरी दिली होती.

**<><><><>**

सामाजिक विकासाच्या कामासाठी सरकार कायमच पुढे राहील असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. ते आज परभणी इथं श्री क्षेत्र नृसिंह मंदिराला भेट दिल्यावर बोलत होते. परभणी जिल्ह्यातली विविध विकासकामं आणि योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात पवार यांच्या उपस्थितीत आज जिल्हास्तरीय बैठक होणार आहे. पवार आज हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यालाही भेट देणार आहेत. परभणीत महापालिकेचा आढावा घेतल्यानंतर उपमुख्यमंत्री हिंगोली जिल्ह्यातील

गुंज या गावाला भेट देऊन विहिरीत पडून मृत्युमुखी पडलेल्या सात महिलांच्या कुटुंबीयांना भेट देणार आहेत.

<><><><>

उडान योजने अंतर्गत १ कोटी ४९ लाख प्रवाशांना परवडणाऱ्या दरात देशांतर्गत हवाई प्रवास उपलब्ध झाला आहे, असं हवाई वाहतूक मंत्रालयानं प्रसिद्ध केलं आहे. सध्या देशात ६२५ उडान मार्गांनी ९० विमानतळं जोडली आहेत. २०१४ मध्ये देशात ७४ विमानतळं होती, ही संख्या २०२४ मध्ये दुप्पटीपेक्षा जास्त होऊन १५९ विमानतळं इतकी झाली आहे.

<><><><>

मुंबई २६/११च्या दहशतवादी हल्ल्यामध्ये आपला कोणत्याही प्रकारे सहभाग असल्याचं आरोपी तहव्वूर राणाने नाकारलं आहे. पाकिस्तान लष्कराच्या वैद्यकीय पथकात असलेल्या राणाने लष्कर-ए-तय्यबाच्या वतीने हल्ल्याच्या जागांची रेकी केल्याची माहिती या घटनेतला एक आरोपी डेव्हिड हेडली याने आधी दिली होती. राणाचे अमेरिकेतून हस्तांतरण झाल्यानंतर दिल्लीत राष्ट्रीय सुरक्षा संस्था त्याची कसून चौकशी करत आहे. ही चौकशी म्हणजे हल्ल्यापूर्वी लष्कर-ए तय्यबा आणि पाकिस्तानच्या गुप्तचर संस्थेने ही योजना आखताना केलेल्या कामाच्या चौकशाचा एक भाग आहे.

<><><><>

मध्य प्रदेशमधे बालाघाट जिल्ह्यात आज पहाटे सुरक्षादलांशी झालेल्या चकमकीत चार महिला माओवादी ठार झाल्या. त्यांच्यावर ६२ लाख रुपयांचं बक्षीस होतं. सध्या या भागात सुरू असलेल्या माओवादविरोधी मोहिमेअंतर्गत ही कारवाई झाल्याची माहिती बालाघाटचे पोलीस अधीक्षक नागेंद्र कुमार सिंह यांनी दिली.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२६ एप्रिल २०२५ - शनिवार

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेटमध्ये आजचा सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि पंजाब किंग्स या संघांमध्ये कोलकाता इथल्या इडन गार्डन मैदानावर होणार आहे. संध्याकाळी साडेसात वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी आकाशवाणी वर ‘मन-की-बात’ कार्यक्रमाच्या माध्यमातून देश-विदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी सादर होणाऱ्या या कार्यक्रमाचा हा १२१ वा भाग असेल. नागरिकांनी त्यांचे विचार आणि सूचना १८००-११-७८०० या टोल फ्री क्रमांकाद्वारे पाठवाव्यात, असं आवाहन करण्यात आलं आहे. आकाशवाणी, दूरदर्शन, तसंच प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब चॅनल वरून मन-की-बात या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण होणार असून त्यानंतर लगेचच विविध प्रादेशिक भाषांमधून या कार्यक्रमाचा अनुवाद प्रसारित करण्यात येईल.

**<><><><><>**

देशातल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये पोलाद क्षेत्रानं ऐतिहासिक कामगिरी बजावली आहे, असं केंद्रीय कोळसा आणि खाण  मंत्री जी  किशन रेड्डी यांनी सांगितलं. ते आज मुंबईत  इंडिया स्टील २०२५ आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषदेत बोलत होते. २०४७ पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी पोलाद क्षेत्राबरोबरच  कोळसा क्षेत्राची वाढ झाली पाहिजे, असं त्यांनी सांगितलं. पोलाद क्षेत्रात किफायतशीर आणि शाश्वततेच्या दृष्टीनं मजबूत अशा कच्च्या मालासाठी रणनीती आखण्याची गरज आहे, असं केंद्रीय मंत्री भूपती राजू यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**